| | |
|---|---|
| ***CNR No.MHND270002512026*** | म.सं.कौ.हिं.का.०२/२०२६<br>जयश्री वि. सुनिल |

## <u>आदेश निशाणी क्र.०५ वर</u>

**०१.** अर्जदारांनी सदरचा अर्ज कौटुंबिक हिंसाचार अधिनियम १२ प्रमाणे दि. २४.०२.२०२६ रोजी दाखल केला आहे. सदर प्रकरणात अर्जदाराने अंतरिम पोटगी मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**०२.** प्रस्तुत प्रकरणात गैरअर्जदार हजर झाले आणि त्यांचे म्हणणे नि.क्र.११ प्रमाणे त्यांनी सादर केले.

**०३.** अर्जदार व गैरअर्जदार यांच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकला, प्रस्तुत अर्ज निकाली काढण्यासाठी खालील मुद्दे उपस्थित होत असून त्यावरील माझे निष्कर्ष व कारणमिमांसा खालीलप्रमाणे नोंदवत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | अर्जदारांनी मागणी केल्याप्रमाणे ती अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? | अर्जदार ही अंतरिम पोटगी म्हणून दरमहा एकत्रीत रुपये २०,०००/– मिळण्यास पात्र आहेत. |
| ०२. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र. १ व २ बाबत</u>**

**०४.** अर्जदाराचे लग्न गैरअर्जदार क्र. १ सुनिल यांचेसोबत १०.०२.२०१९ रोजी हिंदु धर्माच्या रितीरिवाजात आप्तेष्टांच्या समक्ष झाला.

**०५.** पुढे असे सांगण्यात आले की, लग्न झाल्यानंतर दोन ते तीन महिने त्यांचा संसार चांगला चालला. अर्जदाराची जावुबाई ही नांदेड येथे राहत होती, तेव्हा गैरअर्जदार तिला भेटण्यासाठी रुमवर जात होता व अर्जदाराशी सतत भांडण करत असे व तिच्याकडे दुर्लक्ष करत असे. नंतर मे २०१९ मध्ये अर्जदार व गैरअर्जदार दोघेही तिच्या वडिलांकडे

राहण्यासाठी गेलो असता तिथे त्यांनी पैशासाठी वाद घातला. मेडीकल टाकण्यासाठी ५,००,०००/– रुपयाची मागणी केली तेव्हा अर्जदाराचे वडिलांनी सांगितले की, त्यांना शक्य तेवढी मदत करतो, येवढी रक्कम त्यांना शक्य नाही असे म्हटल्यावर परत त्यांनी वाद घातला. त्यामुळे अर्जदाराला खुप ताण आला. तेव्हाच गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदाराची जावु गंगासागर हिच्या वडिलांकडे शिवाजीनगर नांदेड येथे भेटावयास गेले तिथे जाऊन पुन्हा त्यांनी वाद घातला ह्या सगळ्या कारणांमुळे अर्जदाराला त्या टेन्शनमध्येच शिवाजीनगर, नांदेड येथे चक्कर येऊन पडल्या. दि. ०२.०६.२०२१ रोजी पाहुण्यांची बैठक वाडी मुक्ताजी ता. मुदखेड जि. नांदेड येथे झाली व दि. ०७.०६.२०२१ रोजी अर्जदाराला सासरी सोडण्यात आले. तेव्हा जावु गंगासागर तिथे नव्हती तोपर्यंत त्यांच्या संसार दिड महिना चांगला झाला. तेव्हा अर्जदार गरोदर राहीली. अर्जदार चार महिन्याची गरोदर असतांना तिचा परत छळ सुरु केला, त्यात कारणीभुत जावु, सासु भाया विलास उर्फ गुलाब व अर्जदाराचे पती हे कारणीभुत होते. अर्जदाराची जावु ही गैरअर्जदार क्र.१ वर एखाद्या पत्नीसारखा हक्क बजावत होती.

**०६.** गैरअर्जदाराने त्यांच्या म्हणण्यामध्ये त्यांनी अर्जदाराचे सर्व म्हणणे नाकारले आहे. अर्जदार ह्या गर्भवती राहील्यानंतर गैरअर्जदारांनी तिचे बाळ जन्माला येऊ नये म्हणुन सर्वांनी मिळुन संध्याकाळी ०४.३० च्या सुमारास दि. १६.०२.२०२२ मारहाण केली. तेव्हा त्यांचे पोट दुखण्यास सुरु झाले. नंतर तिला जिव्हाळा हॉस्पीटल नांदेड येथे अॅडमिट केले होते. नंतर दि. १९.०२.२०२२ रोजी अर्जदाराला गैरअर्जदाराने पावडेवाडी येथे नेऊन सोडले. तेव्हा अर्जदार ही तिला किकी येथे घेऊन चला असे म्हणत असतांना त्याने तिचे म्हणणे ऐकले नाही. तिची प्रकृती बरोबर नसतांना तिला तुझे वडिलांना बोलवुन घे आणि तु माहेरी जा असे म्हणत होता. अर्जदाराचे वडील कामामध्ये व्यस्त असल्यामुळे ते म्हणाले की, त्यांचे सध्या येणे होत नाही, तोपर्यंत मौजे किकी येथे घेऊन जा असे म्हणाले होते, परंतु त्यांनी त्यांचे ऐकले नाही कारण गैरअर्जदार क्र. १ यांना अर्जदाराचे सासु, जावु, भाया आणि जावेच्या माहेरच्यांचा दबाव होता की, तिला किकिला आणु नको तिला तिथे सोडुन दे आणि तु एकटा ये ती जर इथे आली तर आम्ही तिला येथे राहु देणार नाही अशी स्पष्ट धमकी गैरअर्जदार क्र.१ याला दिली, तेव्हा त्याने तिला एकटे सोडले.

**०७.** अर्जदार पुढे असे सांगतात की, ती माहेरी मौजे चिकाळा ता. मुदखे जि. नांदेड येथे राहत असतांना नांदेड येथे मेडीकलवर ३ महिने जॉब केला असतांना गैरअर्जदार क्र. १ ने

दि. ०७.०६.२०२१ रोजी तेथील कामाजी मारोतराव देशमुख व रवी मारोतराव देशमुख यांच्या समक्ष व चिकाळा येथील अर्जदाराचे नातेवाईकांसमक्ष १२५००/– रुपये तिचे वडिलांकडुन घेतले. अर्जदार हिचे वडीलांची Heart Surgery आल्यामुळे त्यांना खर्च करणे शक्य नाही. तिच्या पतीमध्ये काही सुधारणा होईल म्हणुन वाट पाहिली परंतु काही सुधारणा दिसुन न आल्यामुळे त्यांनी महिला सहायता कक्ष नांदेड येथे अर्ज देऊन सर्व प्रकिया केली, परंतु तिथे पण काही मदत झाली नाही. लग्नानंतर तिला शिक्षण घ्यायचे होते परंतु तिचे शिक्षणाला विरोध केला. अर्जदाराचे बी.फार्मसी पांगरी नांदेड येथे शिक्षण झाले. गैरअर्जदार क्र. १ हा बी.एच.एम.एस. असुन तो बोरबन नांदेड कौठा रोड येथे स्वतःचे होमिओपॅथिक क्लिनीक आहे, तसेच ते विश्वप्रयाग हॉस्पीटल, नांदेड येथे प्रॅक्टीस सुद्धा करतात, त्यामुळे त्यांना दरमहा मिळणारे उत्पन्न ५०,०००/– रुपये आहे व शेतीचे उत्पन्न देखील चांगले आहे.

०८. अर्जदार पुढे असे सांगतात की, तिचे संगोपण व त्यांचे मुलीचे पुढील आयुष्यासाठी व शिक्षणासाठी योग्य ती मदत करावी व पुढे भविष्यात तिला गैरअर्जदारांपासुन कोणताही त्रास होणार नाही अशी व्यवस्था करावी. चार वेळा बैठक घेऊन ती सासरी गेली पण काही दिवस तिथे राहुन तिला मारहाण करुन परत परत तिला माहेरी पाठवत होते. तसेच अर्जदाराचा भाया तिला तिथे असतांना व मोबाईलवर सतत धमकावत होता तु जर येथे राहीलीस तर तुला जिवंत ठेवणार नाही असे म्हणुन सतत मारहाण करत होता. तिने तिचे माहेरी सांगितल्यानंतर, तिचे वडील येऊन त्यांना समजावुन सांगायचे उलट त्यांना म्हणायचे ते अर्जदाराला मारतो तुम्हांला काय करायचे. अर्जदार पुढे असे सांगते की, ती तिच्या वडिलांमुळे जिवंत आहे, नाहीतर त्या लोकांनी तिला केव्हाच मारुन टाकले असते व त्यांनी तिला मारण्यासाठी अनेकवेळा प्रयत्न केला.

०९. प्रस्तुत कायद्याच्या मुळ उद्देशाप्रमाणे अर्जदारास गैरअर्जदाराच्या आर्थिक सामाजिक पातळीप्रमाणे जीवन जगण्याचा अधिकारी आहे. प्रस्तुत कायद्याचा मुळ उद्देश हा महिलांचे संवर्धन व संरक्षण हा आहे. त्यामुळे याक्षणी अर्जदार ही प्रथमदर्शनी स्वतःचे पालनपोषण करण्यास समर्थ आहे किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे. अर्जदाराने कथन केले आहे की, अर्जदार व तिची मुलगी तिच्या माहेरी राहत असल्याचे मान्य केले आहे. गैरअर्जदाराने त्याच्या खुलाशामध्ये त्याने अर्जदार व तिच्या मुलीच्या पालनपोषणासाठी काही व्यवस्था केली आहे किंवा नाही याबाबत कोणतेही कथन केलेले नाही. तसेच, गैरअर्जदार

यांनी अर्जदार व तिच्या मुलीच्या मुलभूत गरजा पुर्ण होण्यासाठी कोणतीही आर्थिक मदत केलेली नाही. त्यामुळे अर्जदार ही प्रथमदर्शनी स्वतःचे पालनपोषण करण्यास असमर्थ असल्याचे दिसून येते. त्यामुळे सदरचा अर्ज निकाली होईपावेतो अर्जदार ही रितसर मुलभुत गरजांसाठी लागणारा खर्च सुद्धा गैरअर्जदाराकडून मिळण्यास प्रथमदर्शनी पात्र आहे. करीता मी या निष्कर्षास येतो व मुद्दा क्र. १ करीता होकारार्थी उत्तर नोंदवित आहे.

**१०.** अर्जदार व तिची मुलगी ह्या दोघी अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहेत. त्यामुळे आजच्या जीवनातील दैनंदिन गरजा, अर्जदाराचे व तिचे मुलीचे राहणीमान याचा विचार करता अर्जदार ही गैरअर्जदाराकडून २०,०००/– अंतरिम पोटगी म्हणून मिळण्यास पात्र आहेत, तसेच गैरअर्जदार यांच्या नावे असलेली जमीन व राहते घर परस्पर विक्री करु नये व गहाण ठेऊ नये. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

**०१.** अर्जदाराचा प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**०२.** गैरअर्जदार याने प्रस्तुतचा अर्ज दाखल तारखेपासुन अर्जदार व तिचे मुलीस दरमहा २०,०००/– रुपये या प्रमाणे या प्रकरणांचा अंतिम निकाल लागेपर्यंत अंतरिम पोटगी द्यावी व तसेच तिचे सासरच्या जमिनीमध्ये व घरामध्ये समान हिस्सा मिळावा, तसेच गैरअर्जदार यांच्या नावे असलेली जमीन व राहते घर परस्पर विक्री करु नये व गहाण ठेऊ नये.

**०३.** गैरअर्जदाराने प्रस्तुत अर्जाचा खर्च म्हणुन ५००/– रुपये अर्जदारास द्यावी.

**०४.** तसेच आदेशाची सत्यप्रत पोलीस स्टेशन, मुदखेड, ता.मुदखेड व संरक्षण अधिकारी, मुदखेड, ता.मुदखेड यांना त्वरीत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव पाठविण्यात यावी.

**सही/–**

दिनांकः २०/०७/२०२६

**(श्रीमती शीतल पी. कौल)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी मुदखेड,
जि. नांदेड

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment are same word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | ---- |
| Name of Court | : | J.M.F.C.Court, Mudkhed |
| Date | : | 20.07.2026 |
| Order signed by the Presiding officer on | : | 20.07.2026 |
| Order uploaded on | : | 20.07.2026 |